# प्रकरण ६ वे

## प्रलोभने व परिणाम

### ६.१ पशुखाद्याची विक्री :-

दूध वाढीसाठी पूरक असणारी बाब म्हणजे दुभत्या जनावरांचे खाद्य होय. जर जनावराना योग्य पशुखाद्य दिले तर जनावरांच्या दूधामध्ये वाढ होते. म्हणुन दूध उत्पादकाना पशुखाद्याचा पुरवठा केला तर संघाच्याही दूध संकलनात वाढ होईल म्हणुन संघाने पशुखाद्याची विक्री प्रथम पासुनच सुरु केली आहे.

संघ स्थापनेच्या अगोदर, शेतीतील वैरण, निकृष्ट प्रतीचे धान्य कुळथी, पेंड, भरडा, अशा प्रकारचे खाद्य दुभत्या जनावाराना दिले जात होते. व त्यापासुन जे दुधाचे उत्पादन होईल ते दूध डेअरीला पाठविले जाते. दूध डेअरीच्या विकासाबरोबर पशुखाद्यासारखा संतुलित आहार जनावरास दिल्यास दूधामध्ये वाढ होऊन दुधाची प्रत ही सुधारते असा प्रचार या भागात डेअरीच्या माध्यमातुन केला गेला. तसेच प्रायोगिक दृष्ट्या दूधाचे उत्पादन पशुखाद्यामुळे कसे वाढते यासाठी कांही उपक्रम राबविले व या भागातील लोकाना पशुखाद्याचे महत्व पटले. सुरवातीच्या काळात अगदि नगण्य स्वरुपात पशुखाद्याची विक्री होत होती. पशुखाद्याचे महत्व पटू लागल्यानंतर १९८० पासुन यामध्ये वाढ झाली. पशुखाद्याचे महत्व लोकाना जसे पटू लागले तसे पशुखाद्य वापराची सवय या भागात होऊ लागली आहे. दूध संकलनात वाढ होण्याच्या दृष्टीने संघ या विभागाला महत्व देतो.

यामुळे या भागातील दूध व्यवसायात वाढ झाली आहे. पशुखाद्याच्या विक्री मुळे दूधाची प्रत सुधारली आहे. दूधा संकलनामध्ये वाढ ही झाली आहे. दूध उत्पादकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे. त्यांच्या बचत व गुंतवणूकीत वाढ होत आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दूभती जनावरे पाळणे व त्यापासुन दूध उत्पादन वाढविणे ही भावना वाढीस लागली आहे.

कर्नाटक व महाराष्ट्रातील कांही कंपण्याकडून पशुखाद्य खरेदी केले जाते. खरेदी किंमतीत अगदी अल्प प्रमाणात नफा घेऊन दूध उत्पादकाना ते खाद्य विकले जाते. टाटा ऑर्के कॅटल फिडस, अमृत कॅटल फिडस् तसेच हत्तरगी कॅटल फिडस् व बेळगांवच्या फ्लोअर मिल्स् या ब्रँड नावाचे पशुखाद्य खरेदी केले जाते.

हे पशुखाद्य गहू भूसा - गोळ्या पेंढ सुग्रास इ स्वरूपात असते. या पशूखाद्याची विक्री संघाच्या मध्यवर्ती ठिकाणातुन केली जाते. गरज पडल्यास संघाच्या दूध वहानातुन कार्यक्षेत्रातील भागामध्ये केली जाते.

पशुखाद्याची विक्री करणे हे संघाचे महत्वाचे प्रलोभन आहे. कारण भागातील दूध व्यवसायात वाढ घडवून आणणे. दूध संकलन वाढविणे यामार्फत भागाचा विकास करणे. म्हणून या संघाने हा पशुखाद्य विक्री विभाग चालु केला आहे.

तक्ता क्र. ६.१ मध्ये पशुखाद्याच्या विक्रीपासुन झालेला नफा निर्देशित केला आहे.

## तक्ता क्र.६.१

### पशुखाद्याची विक्री

| वर्ष | पशुखाद्याची विक्री | नफा तोटा |
|---|---|---|
| १९८०-८१ | ३८४६५.00 | -- |
| ८१-८२ | ९६१४१.00 | + ३१३५.९४ |
| ८२-८३ | ४०५३.00 | + ५६२.00 |
| ८३-८४ | १६२५३१.00 | + १०५७०.६४ |
| ८४-८५ | २८१९५५.00 | + २११२१.७५ |
| ८५-८६ | ४२१२७0.00 | + ३0११६.२५ |
| ८६-८७ | ४७८५४२.00 | + ३३६९१.६0 |
| ८७-८८ | ४९८७४५.00 | + ४२७१९.00 |
| ८८-८९ | ५0५५५१.२३ | + २९४५३.३१ |
| ८९-९० | ३३१२४२.00 | + १३९0१.३७ |

आधार:- संस्थेचे १९८० पासुन ते १९९० पर्यंतचे सर्व वार्षिक अहवाल

वरील तक्ता ६.१ मध्ये पशुखाद्याच्या विक्री पासुन संघाने कशा प्रकारे नफा मिळविला आहे हे दाखविले आहे. १९८७ १९८८ मध्ये रु ४२७१९ चा नफा मिळाला होता. तर १९९० मध्ये १३९0१.३७ रु एवढा मिळाला आहे.

अशा प्रकारे दूध डेअरीच्या माध्यमातुन पशुखाद्याची विक्री व त्यातुन दूधाची वाढ व सभासदांची आर्थिक परिस्थितीमध्ये वाढ घडवून आणणे हे महत्वाचे प्रलोभन तर आहेच. शिवाय हा विभाग संघ नफ्यात चालवित आहे.

## ६.२ दुभत्या जनावरांचा पुरवठा :-

भागातील दूध व्यवसाय वाढविण्यासाठी दुभत्या जनावरांची उपलब्धता करून देणे गरजेचे होते म्हणून संघाने संकरित दुभती जनावारे पुरविण्याची सोय केली आहे. भागातील दूध व्यवसायात वाढ करणे व शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीत वाढ करण्यासाठी या प्रकारची सोय करणेच संघाने ठरविले व भागामध्ये संकरित गाई व म्हैशीची उपलब्धता करून दिली आहे.

भागामध्ये पुर्वी असलेल्या जनावरांमध्ये आणखीन वाढ करण्यासाठी संघाने सभासद शेतक-यांना स्थानिक दूध संस्थेमार्फत म्हैस किंवा गाय खरेदी करणेसाठी कर्ज उपलब्ध करून दिले. साधारणता एका सभासद शेतक-याना जास्तीत जास्त ५०००/- रु कर्ज मंजुर केले गेले हे कर्ज बेळगांव डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक बेळगांव या वित संस्थेकडून कर्ज मंजुर केले आहे. व कर्जाची फेड करण्याचा कालावधी हा प्रत्येक सभासदाला १८ महिन्याचा दिला गेला. तसेच प्रत्येक सभासद शेतक-याकडून जर दहा दिवसांच्या हप्त्यामधील कांही रक्कम संस्था परस्पर कपात करून उर्वरित रक्कम सभासदाना देत त्यामुळे कर्जाची परतफेड ही सुरळीतरित्या होते.

याभागामध्ये दूध संघाने ६००० म्हैशी व गाई विक्री केल्या आहेत. त्यामुळे दूध संकलनात वाढ झाली आहे. एक म्हैश सर्वसाधारण दररोज ४ लिटर दूध देते तिचा दूध देण्याचा कालावधी हा सर्वसाधारण ८ महिने असतो. व एक संकरीत गाय सर्वसाधारण दररोज ८ लिटर दूध देते. दुभत्या जनावारांचा पुरवठा केल्यामुळे दूध संकलनात वाढ झाली आहे.

६.३ पशुवैद्यकीय सेवा :-

दूध संकलन वाढीला लावण्यासाठी व दूध उत्पादनात शास्त्रीय पध्दतीने वाढ करण्यासाठी प्रबोधण म्हणून पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. यासाठी संघाने पशुवैद्यकीय डॉक्टरची नियुक्ती केली आहे. या पशु वैद्यकीय डॉक्टरने वेळोवेळी भागामध्ये व गांव संपर्क ठेवल्या मुळे जनावरांच्या आरोग्यामध्ये चांगल्या प्रकारे वाढ झाली आहे. त्याच प्रमाणे दूध धंदयाची आवड निर्माण झाली आहे. व त्यामुळे दूधाच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

पशु वैद्यकीय सेवेमुळे जनावरांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. व निरोगीपणा वाढीस लागला आहे. वेळोवेळी औषधउपचार होत असल्यामुळे जनावार दगावण्याचे प्रमाण कमी झाले आहे. शास्त्रीय पध्दतीने दूध धंदयाचा विकास व्हावा म्हणून हे प्रबोधण संघ करीत आहे.

६.४ सहकारी औषध दुकानाची स्थापना :-

संघाने नव्याने सुरु केलेला उपक्रम म्हणजे सहकारी तत्वावर औषध दुकान चालविणे. या विभागाची स्थापना १९९३ मध्ये केली. भागातील लोकांना, सभासदाना, तसेच इतर ग्राहकाना त्याचा लाभ मिळत आहे. भागातील जनावरांच्या योग्य निगेसाठी तसेच जनावरांच्या सुदृढ पणासाठी पशुवैद्यकीय सेवेस आवश्यक असणारी सर्व औषधे या विभागात ठेवली आहेत. तसेच या विभागात माणवाच्या आजारावरील सर्व औषधे ही ठेवली आहेत. या औषध दुकानात इतर औषध दुकानापेक्षा २०% कमी दराने औषध विक्री

केली जाते .त्यामुळे भागातील सर्व लोकांना व सभासद शेतक-यांना फायदा होत आहे.

## ६.५ परिणाम :-

१. दूध संकलन केंद्रामध्ये वाढ:-

या दूध संघाच्या स्थापनेमुळे निपाणी परिसरांत प्राथमिक दूध संकलन केंद्रे निर्माण होत आहेत. संख्या ही ६० केंद्रे आहेत. म्हणजेच एकुण दूध संकलन केंद्रांमध्ये वाढ झाली आहे.

२) रोजगार निर्मीती मध्ये वाढ :-

या संघाच्या स्थापनेमुळे या भागात रोजगार निर्मिती झाली आहे. संघाच्या एकुण सेवक वर्गाची संख्या ही ४० आहे. तसेच संकलन केंद्रावरील सेवकांची संख्या ही २०० एवढी आहे. तसेच दूध संघाने दूध संकलनात वाढ होण्यासाठी दुभत्या जनावरांचा पुरवठा केला आहे. हा पुरवठा जवळ जवळ ६००० एवढा आहे. जर एका म्हैशीला एक असा रोजगार धरला तर ६००० रोजगार उपलब्ध झाला आहे असे म्हणता येईल. तसेच दूध वहातुकीसाठी जे ट्रक आहेत त्यांच्या रिपेअरी साठी जी गॅरेजस आहेत त्यामध्ये अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. त्याच प्रमाणे संघाच्या सर्व कागदपत्राची व प्राथमिक दूध संस्थाची सादिलवार छपाई करण्यासाठी दोन प्रिटींग प्रेसची गरज लागते. म्हणजे त्या क्षेत्रातही ८ ते १० लोकाना रोजगार उपलब्ध झाला आहे. अशा प्रकारे अप्रत्यक्षरित्या रोजगार उपलब्ध होऊन रोजगार वाढीची साखळी निर्माण होत आहे.

३) दूध उत्पादकांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये वाढ:-

संघाच्या स्थापनेमुळे भागातील दूध उत्पादकाना त्यांच्या

दुधाला योग्य किंमत मिळत आहे. पुर्वी दूध उत्पादकांची अनेक बाजुने पिळवणूक होत होती. खोटी मापे कमी दर, बिल वाटपात दिरंगाई सहकारी दूध संघामुळे चांगल्या दूधाला चांगला दर मिळाला आहे. त्यामुळे सभासद शेतक-यांच्या आर्थिक परिस्थीतीमध्ये वाढ होत आहे.

४) शेतक-यांची कर्जातुन मुक्तता :-

संघाच्या स्थापनेपासुनसभासद शेतक-यांची कांही अंशी कर्जातुन मुक्तता झाली आहे. शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे या भागातील शेतक-याकडे वर्षातुन एक ते दोन वेळ चलन उपलब्ध होत होते.परंतु संघाची स्थापना झाल्यापासुन या भागामध्ये शेतकरी दूध उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीकोनातुन पाहु लागले. व त्यानी आपला जुना दृष्टीकोन टाकुन देऊन दूध उत्पादनात वाढ करण्यासाठी जनावारे पाळण्यास सुरवात केली. व दूध उत्पादनात वाढ करुन ते दूध संस्थेला घालु लागल्यामुळे सभासद शेतक-यांना दहा दिवसाला दूधाचे बिल मिळु लागले म्हणजेच त्यांच्या हातामध्ये चलन खेळु लागले त्यामुळे सभासद शेतकरी हा सावकारांच्या कर्जातुन काही अंशी मुक्त झाला आहे.

५) खाजगी डेअरीचे वर्चस्व कमी झाले :-

सहकारी दूध संघाची स्थापना झाल्यामुळे निपाणी भागातील जे खाजगी लोक (गवळी) होते त्यांचे वर्चस्व कमी झाले. हे लोक गांवोगांवी फिरुन दूध संकलन करीत असत.त्याची विक्री निपाणी शहरामध्ये होत असे. त्याच्या संकलन व वितरण व्यवहारात नफ्याचे अंतर जात होते. ते संघाच्या स्थापनेमुळे कमी झाले. पर्यायाने गवळी लोकांचे अस्तित्व कमी झाले.

६) ग्राहकाना उत्तम प्रतीच्या दूधाचा पुरवठा:-

संघाच्या स्थापनेमुळे याभागातील दूध ग्राहकाना चांगल्या प्रतीचे (६•५, ६•८, ७• ०फॅटचे ) दूध मिळू लागले आहे• यापूर्वी गवळी लोक हे दूध ग्राहकाना ३•० ते ४•० पर्यंत फॅटचे दूध विकत असत• दूधामध्ये पाणी घालण्याचे प्रमाण जास्त होते•ते आता एकदम कमी झाले आहे• व ग्राहकांच्या मागणीनुसार सध्या संघ पालीथीन पिशवीमधून दूधाची विक्री करीत आहे• त्यामुळे ग्राहकाना चांगले दूध मिळत आहे•

७) दूध उत्पादकाना योग्य किमत मिळत आहे:

या संघाच्या स्थापनेपासुन सभासद दूध उत्पादकाना त्यांच्या दूधाला योग्य किंमत मिळत आहे•सध्या सभासद शेतक-यांना त्यांच्या दूधाला दर हा जिल्हा दूध संघ जो जाहीर करील तो दर मिळत आहे•

पूर्वी दूध दर काय आहेत व कसे असतात यांची कल्पना भागातील दूध उत्पादकाना नव्हती परंतु संघाच्या स्थापनेमुळे दूध उत्पादकांना योग्य किंमत मिळु लागल्यामुळे त्यांच्याआर्थिक परिस्थितीमध्ये वाढ झाली आहे•

८) दूध बिलाचे योग्य वेळी वाटप:-

सहकारी दूध संघामुळे प्रत्येक सभासद शेतक-याना दर १० दिवसाला बिलांचे वाटप केले जाते• हे दूध कितीही असो त्या सभासद शेतक-याला त्याच्या दूध उत्पादनाचे वाटप हे प्रत्येक १० दिवसाला होत असते• पूर्वी खाजगी व्यक्ती किंवा गवळी लोक हे दूधाच्या बिलाच्या वाटपात दिरंगाई करीत असत त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते•सध्या योग्य वेळी दूध बिलाचे पैसे सभासदाना मिळतात•

९) ग्रामीण आर्थीक विकास:-

सहकारी दूध व्यवसायातुन ग्रामीण भागाचा विकास कसा होऊ शकतो हे संघाने सिध्द करुन दाखविले आहे. या भागातील दूध उत्पादकाना त्यांच्या दूधाची किंमत ही योग्य मिळू लागल्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत वाढ झाली आहे. त्यांच्या आर्थीक परिस्थीतीत वाढ झाल्यामुळे त्यांची बचत वाढत आहे. पर्यायाने त्यांची शेती विषयक गुंतवणूक वाढत आहे. शेतीमध्ये नवीन योजना किंवा ट्रॅक्टरचा वापर यामुळे शेती उत्पादनात वाढ होत आहे. शेती उत्पादनात वाढ होणे म्हणजे त्यांच्या उत्पादनात व एकुण उत्पन्नात वाढ होणे होय.

त्याचप्रमाणे दूध जनावरे पाळल्यामुळे त्या जनावरापासुन नैसर्गिक खत मिळते व नैसर्गिक खत हे जमिनीची उत्पादकता वाढविण्यास उपयुक्त ठरते. व शेतकऱ्यांचे एकुण उत्पादनात वाढ होते. या दूध संघांमुळे भागातील कित्येक लोकांना रोजगार मिळतो. आर्थिक परिस्थीतीमध्ये वाढ होते. ग्रामीण भागाचा विकास होतो.

६.६ संघाच्या भविष्यातील अपेक्षा:-

संघाने संकलन होणारे दूध आज तागायत मध्यवर्ती डेअरीला पुरविले आहे. त्यामुळे संघाला फक्त दूध संकलन करुन ते मोठया दूध डेअरीला पाठविलेयाबद्दल प्रति लिटर ७५ पैसे ते १ रु. वहातुक भाडे मिळते .

वहातुक खर्च व व्यवस्थापकीय खर्च वाढत असल्यामुळे दूध उत्पादकाना अजुनही हवा तसा दर मिळत नाही असे हा संघ म्हणतो. यापेक्षा जादा दर देणे शाक्य होत नाही. दूध उत्पादकाना जादा दर देण्याची

संघाची इच्छा आहे. यासाठी संघाची स्वत:ची मोठी दूध प्रकीया करणारी यंत्रणा उभी करण्याची इच्छा आहे. या प्रकल्पामुळे दूध प्रकिया व बाजारपेठ यामध्ये सहज संबध साधला जाणार आहे. म्हणून १ लाख लिटरची हाताळ-ण्याची क्षमता असलेला प्लँट उभारण्याचा संघाचा उद्देश आहे. मगव या भागातील दूध उत्पादकाना योग्य किंमती देतायेईल असे संघाला वाटते.

त्याच बरोबर दूध धंदयामार्फत शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीत भर पाडणारा वेगवेगळ्या उपक्रमांची पुर्तता करण्याचा संघाचा विचार आहे. उदा. आधुनिक पध्दतीची ओली वैरण संतुलीत आहार आधुनिक चा-याचे तंत्रज्ञान इ.

गरजेप्रमाणे भविष्यकाळात बदलण्याची आणि नाविण्य आणण्याची संघाची तयारी आहे हे स्वयंस्पष्ट आहे.